Publication : Sakaal
Dated : 10.07.2020
Page: 3

# तीन हप्त्यांत बिल भरण्याचे 'अदानी'चे आवाहन

मुंबई : सरासरीपेक्षा जास्त आलेल्या वीजबिलांवर उपाय म्हणून ग्राहकांना तीन हप्त्यांमध्ये वीजबिल भरण्याची सुविधा अदानी इलेक्ट्रिसिटीने दिली आहे. विशेष म्हणजे या रकमेवर कोणतेही दंडात्मक व्याज आकारले जाणार नाही. अदानी इलेक्ट्रिसिटीने एका प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे. मीटर रीडिंगनुसार दिलेली बिले योग्य असल्याचा अदानीचा दावा आहे. मासिक बिलाच्या सरासरी रकमेच्या दुप्पट रकमेची बिले ज्यांना आली आहेत, त्या सर्वांना राज्य वीज नियामक आयोगाच्या सूचनांनुसार, तीन मासिक हप्त्यांत ही बिले देता येतील. त्यापोटी त्यांना कोणतेही दंडात्मक व्याज भरावे लागणार नाही; मात्र ठरलेल्या तारखेपर्यंत हा पर्याय स्वीकारणाऱ्यांनाच ही सवलत मिळेल. तसेच ठरलेल्या तारखेलाच ही बिले द्यावी लागतील.